**मराठी भाषा विभाग**
नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

अभिव्यक्ती स्वारस्य व्यक्त करण्यासाठी आमंत्रित सूचना

दूरध्वनी क्र : ०२२-२२७९ ४१६९ Email ID :-vaishali.anapat@nic.in

**क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र. ६७/भाषा-२** **दिनांक : १० जुलै, २०२५**

मराठी भाषा विभागातील व अधिनस्त कार्यालयातील दस्तऐवज, कार्यक्रम/उपक्रम यांचे तसेच, मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन व प्रसिद्धीकरीता व समृद्धीकरीता उपलब्ध असलेले राज्यातील/परराज्यातील/परदेशातील तसेच, इतर भाषेतील मराठी संबंधित संदर्भ साहित्य वा अनुषंगिक बाबी यांच्या लिखित, श्राव्य, दृकश्राव्य वा इतर स्वरुपातील दस्तऐवजीकरणासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने संस्थेची (एजन्सीची) नियुक्ती करण्यासाठी संबंधित संस्थांकडून ऑनलाईन (Online) स्वारस्य मागविण्यात येत आहेत.

२. स्वारस्य सादर करण्याचा दिनांक व वेळ - दि. २५ जुलै, २०२५ पर्यंत

३. अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने स्वारस्य सादर करणेसंबंधीची सविस्तर माहिती मराठी भाषा विभागाच्या https://marathi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

अधिक माहितीसाठी मराठी भाषा विभाग, कार्यासन भाषा-२, नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. या कार्यालयीन पत्त्यावर व vaishali.anapat@nic.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा.

## अनुक्रमणिका

१. अस्वीकरण
२. अभिव्यक्ती स्वारस्य माहिती पत्रक
३. पार्श्वभूमी
४. उद्दिष्टे
५. कामाची व्याप्ती
६. पात्रता निकष
७. बोलींचे मुल्यांकन
८. विभागाचे गरजेनुसार मनुष्यबळ व साधनसामग्री पुरविण्याचे दर
९. तांत्रिक सादरीकरणानुसार गुणांकन
१०. सहभागाचा कालावधी
११. कर आणि कर्तव्ये
१२. बोली सादर करणे

**१. अस्वीकरण :-**

मराठी भाषा विभागातील व अधिनस्त कार्यालयांतील दस्तऐवज, कार्यक्रम/उपक्रम यांचे तसेच, मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन व प्रसिद्धीकरीता व समृद्धीकरीता उपलब्ध असलेले राज्यातील/परराज्यातील/परदेशातील तसेच, इतर भाषेतील मराठी संबंधित संदर्भ साहित्य वा अनुषंगिक बाबी यांच्या लिखित, श्राव्य व दृकश्राव्य स्वरुपातील दस्तऐवजीकरणासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने संस्थेची (एजन्सीची) नियुक्ती करण्यासाठी संबंधित संस्थांकडून ऑनलाईन (Online) स्वारस्य मागविण्यात येत आहेत. याबाबत अधिक माहिती कामाच्या व्याप्तीमध्ये नमूद केली आहे.

अभिव्यक्ती स्वारस्य दस्तऐवजात समाविष्ट असलेल्या माहितीची अचूकता सुनिश्चित करण्यासाठी सर्व प्रयत्न केले गेले असले तरी, या दस्तऐवजात अर्जदारांना आवश्यक असलेली सर्व माहिती समाविष्ट असल्याचा दावा केला जात नाही.

अभिव्यक्ती स्वारस्य दस्तऐवजाच्या अचूकता किंवा पूर्णतेबद्दल कोणत्याही कायद्यानुसार/नियमानुसार कोणतेही दायित्व विभागातर्फे घेतले जाणार नाही. या अभिव्यक्ती स्वारस्य दस्तऐवजात नमूद केलेल्या कोणत्याही किंवा सर्व अटी/माहितीमध्ये कोणतेही कारण न देता आवश्यक त्या सुधारणा करणे/हटवणे याबाबतचे अधिकार मराठी भाषा विभाग राखून ठेवत आहे. तसेच, सदर स्वारस्य अभिव्यक्ती प्रक्रियेसंदर्भात सर्वाधिकार मराठी भाषा विभागाचे राहतील.

या अभिव्यक्ती स्वारस्य दस्तऐवजांच्या अटींनुसार, सादर करावयाच्या स्वारस्यांशी संबंधित खर्चाबाबतच्या कोणत्याही दाव्याचे स्वागत मराठी भाषा विभाग करणार नाही किंवा त्यासाठी जबाबदार राहणार नाही.

## २. अभिव्यक्ती स्वारस्य माहिती विवरणपत्र :-

| अ.क्र. | घटक | तपशील |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाचे नाव | मराठी भाषा विभागातील व अधिनस्त कार्यालयांतील दस्तऐवज, कार्यक्रम/ उपक्रम यांचे तसेच, मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन व प्रसिद्धीकरीता व समृद्धीकरीता उपलब्ध असलेले राज्यातील/परराज्यातील/परदेशातील तसेच, इतर भाषेतील मराठी संबंधित संदर्भ साहित्य वा अनुषंगिक बाबी यांच्या लिखित, श्राव्य व दृकश्राव्य स्वरुपातील दस्तऐवजीकरणासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने संस्थेची (एजन्सीची) नियुक्ती करणे. |
| २. | विभागाचे नाव | मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ३. | संकेतस्थळावर स्वारस्य जाहीर करणे | दिनांक १० जुलै, २०२५ |
| ४. | ई-मेल आणि ऑफलाईन पद्धतीने स्वारस्य सादर करण्याची शेवटची तारीख | दिनांक २५ जुलै, २०२५ |
| ५. | निवडलेल्या एजन्सींचे सादरीकरण | दिनांक २९ जुलै, २०२५ |
| ६. | प्रतिसाद वैधता | दिनांक ३१ जुलै, २०२५ |
| ७. | अभिव्यक्ती स्वारस्य प्रक्रिया शुल्क | रु. ३०००/- |

अभिव्यक्ती स्वारस्य दि. १० जुलै, २०२५ पासून https://marathi.gov.in या मराठी भाषा विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल. सर्व सहभागींना विनंती आहे की, त्यांनी नवीनतम अपडेट्स/सुधारणा (जर असतील तर) मिळविण्यासाठी नियमितपणे संकेतस्थळाला भेट द्यावी.

## ३. पार्श्वभूमी :-

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतर मराठी भाषा विभागाची जबाबदारी आणि काम वाढलेले आहे. केंद्र शासनाला विविध प्रस्ताव पाठवणे याबरोबरच राज्यभर कार्यक्रम अंदाजपत्रकानुसार विविध उपक्रम राबवणे यावर देखील मोठ्या प्रमाणात काम चालू आहे. विभागातील उपक्रमांची संख्या वाढत आहे. आंतरराष्ट्रीय मंचाच्या कामाला गती येत आहे. विभागातर्फे तयार करण्यात येत असलेल्या पुढील तीन वर्षाच्या कामाबाबतचे ढोबळ नियोजन लक्षात घेता विभागाच्या कामाचा व्याप वाढता राहणार आहे.

या पार्श्वभूमीवर विभागातर्फे क्षेत्रीय उपक्रमांबरोबरच विविध प्रकारच्या तज्ज्ञांच्या कार्यशाळा, विद्वानांबरोबरच्या बैठका त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातील वाचन विषयक आणि मराठी भाषा विषयक प्रयोग, परंपरा आणि लोक संस्कृतीच्या अंगाने भाषा विषयक चालीरिती यापर्यंत पोहोचण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. अशा प्रकारच्या सर्व कामकाजाचे लिखित,

श्राव्य आणि दृकश्राव्य दस्तऐवजीकरण महत्वाचे आहे. त्या आधारावरच पुढील काळातील सर्व योजना, उपक्रम आणि कार्यक्रम बांधले जाणार आहेत. दस्तऐवजीकरणाचे महत्त्व लक्षात घेता त्यासाठी विभागाची काही एक व्यवस्था निर्माण करणे गरजेचे झालेले आहे.

या पार्श्वभुमीवर मराठी भाषा विभागातील व अधिनस्त कार्यालयांतील दस्तऐवज, कार्यक्रम/उपक्रम यांचे तसेच, मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन व प्रसिद्धीकरीता व समृद्धीकरीता उपलब्ध असलेले राज्यातील/परराज्यातील/परदेशातील तसेच, इतर भाषेतील मराठी संबंधित संदर्भ साहित्य वा अनुषंगिक बाबी यांच्या लिखित, श्राव्य, दृकश्राव्य वा इतर स्वरुपातील दस्तऐवजीकरणासाठी अभिव्यक्ती स्वारस्य पद्धतीने संस्थेची (एजन्सीची) नियुक्ती करणे आवश्यक आहे.

## ४. उद्दिष्टे :-

१. मराठी भाषा विभाग (खुद्द) शी संबंधित तसेच मराठी भाषेच्या प्रचार-प्रसार, जतन, संवर्धन व प्रसिद्धीकरीता व समृद्धीकरीता उपलब्ध असलेले राज्यातील/ परराज्यातील/परदेशातील तसेच, इतर भाषेतील मराठीशी संबंधित संदर्भ साहित्य वा अनुषंगिक बाबी यांचे लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे.

२. भाषा संचालनालय व त्यांच्याशी संबंधित कामकाजाचे लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे.

३. राज्य मराठी विकास संस्था व त्यांच्याशी संबंधित कामकाजाचे लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे.

४. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व त्यांच्याशी संबंधित कामकाजाचे लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे.

५. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ व त्यांच्याशी संबंधित कामकाजाचे लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे.

## ५. कामाची व्याप्ती

मराठी भाषा विभागाच्या कामकाजाचे दस्तऐवजीकरण करणे. लिखित, श्राव्य आणि दृकश्राव्य दस्तऐवजीकरण करताना तो संदर्भ अभिलेख म्हणून जतन करणे आवश्यक आहे. अभिलेखा व्यतिरिक्त पुढील प्रकारे वापरता यावा अशा पध्दतीने output वापरता येईल, अशा पध्दतीने दस्तऐवजीकरण करणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | माध्यम | अपेक्षित सेवा |
|---|---|---|
| १. | **छापील** | |
| | • वर्तमानपत्र | • बातम्या |
| | • नियतकालिक | • लेख |
| | • पुस्तक | • फोटो ओळी |
| | | • पुस्तक मजकूर |
| | | • पुस्तक संपादन व मांडणी |
| २. | **श्राव्य** | |

| | | |
|---|---|---|
| | • एफ एम चॅनेल व आकाशवाणी | • भाषण |
| | • ऑडिओ पब्लिकेशन | • मुलाखत |
| | | • संगीतबध्द जिंगल |
| | | • ऑडिओ स्पॉट |
| | | • ऑडिओ बुक |
| | | • पॉडकास्ट |
| ३. | **दृक श्राव्य** | |
| | • टीव्ही चॅनेल | • लघुपट |
| | • यु ट्यूब चॅनेल | • डॉक्युमेंटरी |
| | • वेबसाईट/पोर्टल | • चित्रीकरण |
| | | • चित्रीकरणाचे संपादन |
| | | • गाणं/कविता संगीतबध्द करणे |
| ४. | **वेबसाईट/सोशल मीडिया** (केवळ अपलोड) | • पोस्ट |
| | | • ब्लॉग |
| | | • व्लॉग |
| | | • व्हीसी रेकॉर्डिंग/संपादन |

- विभागातील आशय निर्मिती करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसोबत समन्वय ठेवणे आवश्यक राहील.
- दस्तऐवजीकरण करण्याबाबतचे मुद्दे विभागाकडून देण्यात येतील.
- कोणत्याही प्रकारच्या आशय निर्मिती करता विभागातील अवर सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची पूर्व संमती घेणे आवश्यक राहील.
- दस्तऐवजीकरणाच्या कामानिमित्त होणारा प्रवास व निवास व्यवस्था/खर्च विभागातर्फे केला जाईल.
- दस्तऐवजीकरणाच्या कामादरम्यान क्षेत्रकार्यासाठी जाणाऱ्या चमूचा होणारा भोजन खर्च पुरवठादार संस्थेने स्वत: करावा.

## ६. पात्रता निकष :-

इच्छूक अभिव्यक्ती (EOI) मध्ये सहभागी होण्यासाठी संस्थेने/एजन्सीने खालील पात्रता अटी पूर्ण करणे अपेक्षित आहे :-

- संस्थेकडे/एजन्सीकडे वैध GST क्रमांक असावा.
- प्रकल्प प्रमुखाला मराठीतील लेखन कामाचा २० वर्षांहून अधिक अनुभव असावा.
- लेखन करणाऱ्यांना लेखन कामाची तसेच श्राव्य आणि दृकश्राव्य दस्तऐवजीकरण करणाऱ्या तज्ज्ञांना त्या कामाची किमान ५ वर्षांची पार्श्वभूमी असावी.
- बोलीदारांनी पात्रता अटी पूर्ण करण्यासाठी कागदोपत्री पुरावे जोडावेत.
- बोली लावणारी संस्था/एजन्सी भारतात नोंदणीकृत असावी आणि तिचा कार्यालयीन पत्ता मुंबईतील असावा.

## ७. बोलीचे मूल्यांकन

अ) संस्थेच्या/एजन्सीच्या अंतिम निवडीमध्ये, मुल्यांकनाच्या आधारावर आर्थिक बोलीला ५० टक्के गुण प्रदान करण्यात येतील.

ब) तांत्रिक सादरीकरणानुसार गुणांकन :- अभिव्यक्ती स्वारस्यमध्ये भाग घेणाऱ्या संस्थांचे तांत्रिक सादरीकरण पाहून विभागातर्फे ५० टक्के गुणांकन दिले जाईल.

**तांत्रिक मुल्यांकनाचे स्वरुप :-**

| अ.क्र. | माध्यम | वर्णन | गुण (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १. | लिखित/छापील | बातम्या, लेख, फोटो ओळी, पुस्तक मजकूर,पुस्तक संपादन व मांडणी, भाषण. | १०% |
| २. | श्राव्य | भाषण, मुलाखत, संगीतबध्द जिंगल, ऑडिओ स्पॉट, ऑडिओबुक, पॉडकास्ट. | १०% |
| ३. | दृक श्राव्य | लघुपट, डॉक्युमेंटरी, चित्रीकरण, चित्रीकरणाचे संपादन, गाणं/कविता संगीतबध्द करणे, भाषण | १०% |
| ४. | वेबसाईट/सोशल मीडिया (केवळ अपलोड) | ब्लॉग, व्हीसी रेकॉर्डिंग/संपादन | १०% |
| ५. | मनुष्यबळ क्षमता | कुशल/अकुशल मनुष्यबळ क्षमता | १०% |

## ८. सहभागाचा कालावधी

निवडलेल्या एजन्सीबरोबर प्रथम करार करण्यात येईल व नंतर कार्यादेश देण्यात येईल. निवडलेली एजन्सी कार्यादेश तारखेपासून काम सुरू करेल आणि त्या तारखेपासून २४ महिन्यांसाठी वैध असेल. कामगिरीच्या आधारावर, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने आणि एजन्सीच्या संमतीने करार आणखी १२ महिन्यांसाठी वाढवता येईल. एजन्सीने दिलेले दर पहिल्या दोन वर्षांसाठी वैध असतील आणि त्यानंतर कराराचे नूतनीकरण झाल्यास तिसऱ्या वर्षासाठी किमतीत १० टक्क्यांपर्यंत वाढ केली जाईल. यशस्वी एजन्सीला देयक सादर केल्यानंतर नियोजित शुल्क दिले जाईल. अग्रीम देण्यात येणार नाही. नियोजित शुल्क देताना देयकाची छाननी करण्याचे सर्वाधिकार सह सचिव, मराठी भाषा विभाग ह्यांना असतील.

## ९. कर आणि कर्तव्ये

सेवांच्या वितरणाशी संबंधित कर्मचाऱ्यांच्या आस्थापना आणि कायदेशीर बाबींची जबाबदारी संबंधित संस्थेची/एजन्सीची असेल. त्याबाबत विभागाची जबाबदारी राहणार नाही. कराराच्या कालावधीसाठी अंतिम आणि देण्यात आलेल्या शुल्काव्यतिरिक्त विभागाकडून GST/CGST/SGST/IGST (जे आणि ज्या दराने लागू असेल ते) कर अतिरिक्त दिला जाईल.

## १०. बोली सादर करणे

**स्वारस्य दोन भागात सादर करावे –**

**भाग १** – मध्ये तांत्रिक स्वारस्य समाविष्ट आहे ज्यामध्ये कामाचे नियोजन, संसाधन व्यक्तींची पात्रता आणि अनुभव, ज्याला यापुढे तांत्रिक स्वारस्य म्हणून संबोधले जाईल. ह्या भागाचे सादरीकरण पाहून ५० टक्के गुणांकन केले जाईल.

**भाग २** – मध्ये फक्त आर्थिक बोली म्हणून संदर्भित केलेल्या शुल्कांचा समावेश आहे. त्यात विविध सेवांसाठी शुल्क स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. ह्या भागासाठीचा बंद लिफाफा विभागाच्या निवड समितीसमोर उघडला जाईल व त्यातून जास्तीत जास्त पाच निविदाधारक तांत्रिक निविदेच्या सादरीकरणासाठी निवडले जातील.

**भाग २.१) आर्थिक बोली :-**

| अ.क्र. | प्रकार (अंतिम output) | एकक | दर (रु.) |
|---|---|---|---|
| १. | बातम्या | गरजेप्रमाणे (साधारण ३०० शब्द) | |
| २. | लेख | गरजेप्रमाणे (साधारण ७५० शब्द) | |
| ३. | फोटो ओळी | गरजेप्रमाणे | |
| ४. | पुस्तक मजकूर | प्रती पृष्ठ | |
| ५. | पुस्तक संपादन व मांडणी | प्रती पृष्ठ | |
| ६. | भाषण (लिखित, श्राव्य, दृकश्राव्य) | गरजेप्रमाणे (साधारण १५०० शब्द) | |
| ७. | मुलाखत (लिखित, श्राव्य, दृकश्राव्य) | गरजेप्रमाणे (साधारण १५०० शब्द) | |
| ८. | संगीतबध्द जिंगल | प्रती २० सेकंद | |
| ९. | ऑडिओ स्पॉट | प्रती १० सेकंद | |
| १०. | ऑडिओ बुक | प्रती पृष्ठ | |
| ११. | पॉडकास्ट | प्रती ३० मिनिटं | |
| १२. | लघुपट (तीन लोकेशन्सपर्यंत) | प्रती ५ मिनिटं | |
| १३. | चित्रीकरणाचे संपादन | प्रती ५ मिनिटं | |
| १४. | गाणं/कविता संगीतबध्द करणे | प्रती रचना | |

विभागाने अंतिमत: मान्य केलेल्या output वर वरील दराने मोबदला दिला जाईल. उपरोक्त एककापेक्षा मान्य केलेले output जास्त असल्यास तेवढ्या भागासाठी मोबदल्याचा दर मूळ दराच्या ५० टक्के राहील.

**भाग २.२) विभागाच्या गरजेनुसार मनुष्यबळ व साधनसामग्री पुरवण्याचे दर :-**

| अ.क्र. | प्रकार | दर | रुपये |
|---|---|---|---|
| १. | लिखित दस्तऐवजीकरण<br>(एका कामासाठी जास्तीत जास्त २) | प्रतिव्यक्ती प्रतिदिवस | |
| २. | श्राव्य दस्तऐवजीकरण<br>(एका कामासाठी जास्तीत जास्त २) | अ) प्रतिव्यक्ती प्रतिदिवस<br>ब) साधनसामुग्री प्रतिदिवस (तंत्रज्ञांच्या खर्चासह) | |
| ३. | दृकश्राव्य दस्तऐवजीकरण<br>(एका कामासाठी जास्तीत जास्त ४) | अ) प्रतिव्यक्ती प्रतिदिवस<br>ब) साधनसामुग्री प्रतिदिवस (तंत्रज्ञांच्या खर्चासह) | |

***वरीलप्रमाणे प्रतिव्यक्ती दर सरासरीने द्यावेत.***

ह्या स्वारस्य अभिव्यक्तीबाबत चौकशी व शंकासमाधानासाठी श्रीम. धादवड, अवर सचिव, मराठी भाषा विभाग ह्यांच्याशी **०२२-२२७९४१७०** किंवा **०२२-२२८५१२२२** ह्या क्रमांकावर तसेच, vaishali.anapat@nic.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा .

----------